# मादाम माँटेसोरी आणि बालस्वातंत्र्य

शास्त्रीय बालशिक्षणाचे पहिले आणि मूलभूत सूत्र आहे ते म्हणजे 'बालस्वातंत्र्य'; आणि याविषयीचा पहिला ठणठणीत उदगार काढला आहे तो बालशिक्षणाच्या आद्य प्रणेत्या मादाम माँटेसोरी यांनी.

बालकाच्या स्वातंत्र्याची, त्याच्या उपजत स्वयंस्फूर्तीची नि स्वावलंबी कृतीची क्रांतिकारक कल्पना माँटेसोरीबाईंनी, विसाव्या शतकाच्या सुरुवातीसच मांडली ; त्यासाठी त्यांनी तत्कालीन मानसशास्त्राचा आधार घेतला. बालक समजावून घेतल्याशिवाय त्याच्या शिक्षणाचा विचार करताच येणार नाही अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली, आणि बालक समजावून घ्यायचे असेल तर त्याचे त्याच्या मुक्त, स्वतंत्र अवस्थेतच अवलोकन केले पाहिजे, अशी त्यांची सूचना होती. स्वातंत्र्याच्या वातावरणाच बालकाला आपल्या उपजत प्रतिभेने स्वयंशिक्षण करता येते, हे एक चिरंतन सत्य माँटेसोरीबाईंनी मांडले.

मुक्त अवस्थेत असणारे बालक हे नेहमीच आपल्या अंतःप्रेरणेने वागत असते. आपल्या अंतर्यामी असणारी प्रेरणा ही बालकाला उपजतच लाभलेली असते, आणि ही प्रेरणा घेऊनच मूल जन्मल्यापासून आपल्या स्वतःच्या विकासासाठी धडपडत असते. या स्वयंप्रेरणेनेच लहान मूल आपल्या हातापायांची हालचाल करून आपले स्नायू बळकट बनवीत असते. आपल्या ज्ञानेंद्रियांना सततचा सराव देऊन त्यांना कार्यरत ठेवीत असते. याचकालात आजूबाजूच्या जगाच्या अवलोकनांतून, बालक, आपले आपण शिकत जाते, जगाचे आकलन करून घेत असते. बौद्धिक नि भावनिक विकासाची सुरुवातही अगदी अल्प वयापासूनच होत असते, आणि बालकाची नैसर्गिक प्रेरणाच त्याला खत-पाणी घालीत असते.

माँटेसोरीबाईंनी प्रत्यक्ष प्रयोगांतून साकार झालेली बालशिक्षण पद्धती मांडताना, 'स्वातंत्र्याच्या संकल्पनेला आपल्या शिक्षणपद्धतीत पायाभूत तत्त्व म्हणून मांडले आहे. बालकाला कोणत्याही प्रकारच्या मानसिक दडपणाखाली ठेवल्यास बालकाची ही नैसर्गिक स्वयंविकासाची प्रेरणाच नाहिशी होण्याचा धोका असतो. माँटेसोरींचे म्हणणे असे आहे की, बालकाला वर्गाचे नि शाळेचे वातावरण निर्भय वाटले पाहिजे. बहुधा शाळेतील शिक्षक हेच बालकाच्या भयाचे प्रमुख कारण असते. शिक्षकाची उग्र, करडी नजर, हातातली छडी, शाळेतील शिस्तीचा बडगा , धाक, शिक्षा आणि परीक्षा या गोष्टी शालेय वातावरण भयभीत करून सोडत असतात. हा आपला अनुभव आहे. अशा शिक्षककेंद्री शिक्षणातून बालकाचे विकासक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते. बालकाची स्वयंस्फूर्ती आक्रसते, बालकाच्या स्वावलंबी क्रियाशीलतेला दडपून टाकले जाते, आणि एकूणच बालकाची स्वयंविकासाची निसर्गदत्त प्रेरणाच दूषित होते.

माँटेसोरीबाईंनी बालस्वातंत्र्याच्या पायावर उभी राहणारी एक नवीन शिक्षणपद्धती जगासमोर आणली. यापद्धतीत बालशाळांमध्ये प्रेमाचे, विश्वासाचे, मुक्ततेचे नि हसत-खेळत शिकण्याचे वातावरण, शिक्षकांकडून जाणीवपूर्वक जोपासले जाते. मुले आपली आपण शिकतात आणि त्यासाठी माँटेसोरींनी शैक्षणिक साधनांचे एक नवे विश्व निर्माण केले, शाळांतून आणले. यात जीवनव्यवहाराची नि हस्तव्यवसायाची अनेक साधने येतात. शिवाय बागकाम , प्राणीसंगोपन स्वाध्याय उपक्रम, सामाजिक शिक्षण असेही कितीतरी आणि मनोरंजक उपक्रम येतात. माँटेसोरींचे म्हणजे असे आहे की, या साधनांमुळे नि उपक्रमांमुळे शिक्षण हे

बालकाच्या 'स्वाधीन' राहते व त्याकरवी शिक्षण जसे पुढे सरकते तसेच बालकाची स्वातंत्र्याची वृत्ती जोपासली जाते, विकासित होत जाते.

बालकाला, त्याच्या स्वातंत्र्याच्या वृत्तीला मुक्त वातावरण पुरवीत नसेल तर ती शिक्षणव्यवस्था नाकारण्याचे धैर्य आपण दाखविले पाहिजे. शिक्षकांना, शिक्षणसंस्थांना, शासनाला व पालकांना हे बालस्वातंत्र्याचे महत्त्व पटवून द्यायला हवे आहे. कारण, आजची बालके शाळांतून आणि आपापल्या घरांतूनही विलक्षण दडपणाखाली शिकत आहेत आणि तथाकथित पद्धतींनी संस्कारित होत आहेत.. शाळांचे बंदिस्त वातावरण, पठडीबद्ध शिक्षण, शिक्षकांच्या शिक्षांचे भय, बालकांवर वाढत्या प्रमाणात ओझी लादणारे शासकीय शिक्षणधोरण आणि घरोघरी पालकाच्या अनाठायी, आग्रही आशा -आकांक्षांचे दडपण याखाली बिचारी बालके आपले बाल्यच हरवून बसत आहेत. वेळापत्रकांच्या नि अभ्यासाच्या ओझ्याने अकालीच प्रौढ होत आहेत. त्यातून त्यांच्या बुद्धीच्या उपजत क्षमता आणि स्वयंप्रेरित विकासाच्या शक्यता मारल्या जात आहेत. अशा शिक्षणपद्धतीत न शारीरिक, मानसिक नि बौद्धिकदृष्ट्या कमजोरी आणि परावलंबी नागरिक निर्माण होण्याच्या शक्यताच मात्र वाढत आहेत.

वास्तविक, देशाचे सामाजिक आणि सांस्कृतिक स्थैर्य, देशाचा राजकीय नि आर्थिक विकास, न्याय्यतेचे नि समतेचे वातावरण आणि जागतिक पटलावरील देशाचे स्थान हे प्रामुख्याने अवलंबून असते ते, देशातील नागरिकांचे विचारस्वातंत्र्य किती टिकून आहे यावर विचारस्वातंत्र्य हाच लोकशाहीचा आधार आहे. व्यक्तीची स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता टिकून असेल तर, लोकशाहीत, व्यक्ती आपला कृतीशील सहभाग देऊ शकते. याउलट, विशिष्ट विचारपठडीची गुलामी स्वीकारणारी व्यक्ती, आपल्या स्वतंत्र विचारशक्तीच्या वेळोवेळी येणाऱ्या उर्मींचे दमन करण्यातच आयुष्याचा फार मोठा उत्पादक भाग वाया घालवीत राहते.

मूल जन्माला येते तेच मुळी स्वतंत्र विचाराची जैविक नि मानसिक क्षमता घेऊन. स्वयंस्फूर्ती नि स्वयंशिक्षणाची प्रेरणा घेऊन बालकाची, संदर्भातील नैसर्गिकता टिकवून ठेवण्यासाठी बालकाला घरी नि दारी स्वातंत्र्याचे वातावरण जाणीवपूर्वक नि काळजीपूर्वक पुरवायचे असते. असे केले तरच, जे काही घडण्याचे संचित घेऊन बालक जन्माला आलेले असते, ते घडण्याच्या दिशेने बालकाचा अबाधितपणे होऊ शकतो. बालकातून जन्माला येणारा प्रौढ स्वतंत्र विचाराची ताकद घेऊन आयुष्यात विकास उभा राहतो.महाराष्ट्रात बालशिक्षणाची एक चळवळ म्हणून उभ्या राहिलेल्या महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेने ३१ ऑगस्ट हा 'बालस्वातंत्र्य दिन' म्हणून साजरा करावा असे आवाहन केले आहे. कारण, मानवाच्या स्वातंत्र्याचे पायाभूत तत्त्व बालकाच्या स्वातंत्र्यात दर्शविणाऱ्या थोर विदुषी मादाम मॉंटेसोरी यांचा तो जन्मदिन आहे. योगायोग असा आहे की, मॉंटेसोरींनी दर्शविलेल्या बालविकासाच्या वाटेवरूनच आयुष्यातील पन्नास वर्षे कृतिशील वाटचाल क रणाऱ्या ताराबाई मोडक यांची ३१ ऑगस्ट ही पुण्यतिथी आहे.

लहान मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी, आपण सारे बालस्वातंत्र्याचा आग्रह धरूया. बालकांचे बाल्य सांभाळू या. बालकांना त्यांच्या नैसर्गिक वाढीसाठी मुक्त वातावरण पुरविण्याची शपथ घेऊया. या स्वतंत्र देशातील बालकांनाही 'स्वतंत्र' करू या.

**बालकाचे स्वातंत्र्य : मादाम माँटेसोरींचे विचार**

माँटेसोरींच्या बालस्वातंत्र्यविषयक विचारांना मानसशास्त्राचा आधार आहे. तसेच बालकाचे सूक्ष्म निरीक्षण करून बालकाचे मानस समजावून घेता येते असे त्या म्हणतात.

बालस्वातंत्र्याविषयी त्यांचे विचार पुढीलप्रमाणे आहेत :

१. बालकाचे अवलोकन करण्यासाठी विकृतीतून बाहेर काढून त्याला साधारण स्थितीत आणणे म्हणजे बालकाची विकृतीतून मुक्तता करणे हे माँटेसोरींच्या बालस्वातंत्र्य संकल्पनेचे एक परिमाण आहे.

२. बालक हे आपल्या अंतःप्रेरणेने वागत असते. ती त्याची नैसर्गिक प्रेरणा असते; ही मानवाच्या

व्यक्तिगत विकासाची प्रेरणा असते. या प्रेरणेला वाव देण्यासाठी बालकाला सर्व प्रकारच्या दडपणापासून मुक्त ठेवायला हवे.

३. बालक प्रौढांच्या अनुकरणांतून शिकत असते. हे समजून केलेले अनुकरण असते. असे अनुकरण हे एक शैक्षणिक काय असते. स्नायूंना सराव देण्यासाठी तसेच बौद्धिक स्तरावरील वस्तू परिचयासाठी केलेले ते पुनरावर्तन असते.

४. जन्मल्यापासून बालक संवेदनशील असते. त्याची स्वयंशिक्षणाची प्रेरणा खूपच जागृत असते. ती टिकवून ठेवणे अगत्याचे असते. त्यासाठी त्याच्यावर शिक्षण लादता कामा नये.

५. बालकाला स्वावलंबनाचे वेड असते, यामागेही त्याची नैसर्गिक प्रेरणा व विकासाची गरज असते. यासाठी वा शाळेत स्वावलंबी कृतींना अडथळा न करता, उलट त्याच्या स्वयंप्रयत्नांना वाव दिला पाहिजे.

६. बालकाच्या स्वयंस्फूर्तीला योग्य असे वातावरण पुरवणे म्हणजेच स्वातंत्र्याचे वातावरण पुरवणे होय. असे वातावरण बालकाच्या क्रियाशीलतेला चालना देणारे, आव्हान देणारे म्हणून महत्त्वाचे असते.

७. बालक ही एक निसर्गतः स्वतंत्र व्यक्ती असते; तिचा जन्म, तिचा विकास, तिचा मृत्यू या स्वतंत्र गोष्टी आहेत.

८. बालकाला स्वतःला विकास करवून घ्यायचे स्वातंत्र्य असले पाहिजे. हा विकास स्वतःच्या कलाने,स्वतःच्या वेगाने करण्यासाठी वाव देणे, अवकाश देणे, म्हणजे बालकाचे स्वातंत्र्य होय.

९. बालकाला घरचे नि शाळेचे वातावरण निर्भय वाटले पाहिजे. शाळेतील शिक्षक, शिस्तीचा बडगा,

धाक, शिक्षा, परीक्षा या गोष्टी शालेय वातावरण भयग्रस्त करतात. यातून बालकाचे स्वयंशिक्षणाचे स्वातंत्र्य हिरावले जाते.

❖